## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ६३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०२/२०१८

**१) अल्पवयीन मुलीला पळवुन नेवुन अत्याचार करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २९/०१/२०१८ चे १४.००ते सायंकाळ पर्यंत यातील अल्पवयीन पिडीत मुलगी हिला यातील आरोपी क.०१ याने चारचाकी वाहनात बसवुन तिला वाहनात बसवुन तिच्यावर जबरी अत्याचार केला. तसेच आरोपी क.०२ यास फोन करून त्याला बोलावुन आरोपी क.०१ ने आपले चारचाकी वाहन ठेवुन आरोपी क.०२ याने चारचाकी वाहनाने एकांत ठिकाणी नेवुन आरोपी क.०२ ने तिच्याचर जबरी अत्याचार केला, व घडलेल्या घटने बाबत घरी किंवा कोणालाही सांगितल्यास तुला व तुझ्या आई-वडीलांना जिवे मारण्याची धमकी दिली, व तिला १,५००/रु. चा मोबाईल खरेदी करून देवुन पैश्याची लालच दाखवल्याने फिर्यादीचे बयाणा वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३६३,३६६(अ),३७६(२)(ह)(ड),५०६ भादंवि. सहकलम ८,१२ बाललैंगिक अत्याचार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १८/०१/२०१७ ते २९/०१/२०१८ चे ९.३३ वाजता. दरम्यान यातील मोबाईल धारक आरोपीतांनी फिर्यादीस फोन लावुन अश्लिल शिवीगाळ करून धमकी दिली, तसेच यातील मोबाईल धारक व आरोपी क्र. ३, ४ ने यातील फिर्यादीचे पत्नीला सुध्दा वारंवार फोन लावुन तिचे सोबत ओळखी वाढविण्याचा प्रयत्न करून, तिचा वियभंग करण्याचा उद्देशाने तिला वाईट इसारे करून, तिचेकडे वाईट नजरेने पाहत असल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३५४(ड),२९४,५०७,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. दिक्षीत पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) थापडाने मारून दात पडल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३१/१२/२०१७ चे १६.०० ते १६.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी सुनिल रामाजी मेश्राम वय ५१ वर्ष रा. विद्यानगर भंडारा मुख्याधापक संत गुलाब बाबा मानवता प्राथमीक शाळा पंप ठाणा येथे शासकीय कर्तव्य करीत असतांना यातील आरोपी हा तेथे येवुन फिर्यादीस म्हणाला की तुम्ही तुमच्या मुलीला माझ्या विरोधात भडकावले त्यामुळे तिने माझी पोलीसात तक्रार केली आहे तुम्ही ,माझे सोबत पोलीस स्टेशनला चला, असे म्हटल्याने फिर्यादीने नेण्यास नकार दिल्याने आरोपीने फिर्यादी कॉल्लर पकडुन डावे गालावर थापडाने मारल्याने फिर्यादीचे डावे बाजुचा वरचा दात पडला व शर्टला रक्त लागल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. परीक्षण अहवाला वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२५,३५३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगिर पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४)अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३१/१२/२०१७ चे १६.१५ वाजता. दरम्यान यातील आरोपी याने फिर्यादी सोबत नगर परिषदेचे लिज न मिळाल्याचे कारणा वरून मनात राग पकडुन फिर्यादी व आमदार वाघमारे व सहकारी हे मुख्यमंत्री साहेबांचे आगमना मंडपाची करण्या करीता गेले असता, यातील आरोपीने आमदार वाघमारे सा. यांना अश्लिल शब्दात शिवीगाळ केली, व आमदार सा. यांचे कॉल्लर पकडले तसेच फिर्यादीची गच्ची पकडुन फिर्यादीला मारहान केली व फिर्यादीला जिवाने मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी शामकुमार रामाजी धुर्वे वय ५२ वर्ष रा. राजेन्द्र वार्ड तुमसर नगरसेवक यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३५३,२९४,५०६,३२३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. म्हसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) अज्ञात वाहन चालकाच्या धडकेत एकाचा मृत्यु. :–**

दिनांक ३०/०१/२०१८ चे २१.३५ वाजता. दरम्यान यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकल क्र. एमएच ३१ सीएफ २३८० ला धडक मारून मोटार सायकल वरील राहुल निर्मल विश्वास वय २२ वर्ष रा. ट्रेजरी कॉलनी रविद्रनाथ टागोर वार्ड भंडारा व एक अनोळखी इसम याचे अपघात करून त्याचे मारणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने, सरतर्फे फर्यादी पोहवा. उके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**६) निष्काळजीपणे वाहन चालवुन एकाचा मृत्यु. :–**

दिनांक ३०/०१/२०१८ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील अज्ञात आरोपी ट्रॅक्टर चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपने चालवुन मोहीत सुधीर कुकळे वय ०८ वर्ष रा. पालोरा यास अपघात करून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी भिस्मराज धनराज कुकळे वय ३० वर्ष रा. पालोरा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कोंयडे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**७) ट्रकच्या धडकेत एकाचा उपचारा दरम्यान मृत्यु. :–**

दिनांक ३१/०१/२०१८ चे १७.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी दिलीप केलस वकुंठी वय २६ वर्ष रा. निलागोंदी जि. गोंदीया याचा वडील जखमी कैलास दशरथ वैकुंठी वय ५५ वर्ष हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३५ यु ६२१९ वर पत्नी सौ.दुर्गा वय ४६ वर्ष व ज्योती मनोज गिरी वय २२ वर्ष व तिचे २ लहान मुले दिव्यांक वय ३ वर्ष व नैतिक वय ०१ वर्ष यांना बसवुन रोड ओलांडत असता, तुमसर कडुन मोहाडी कडे जाण–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपने चालवुन जखमीचे मोटार साकलला धडक मारून गंभिर जखमी केले , व उपचारा दरम्यान सु.बो दवाखाना तुमसर येथे जखमी दुर्गा ही मरण पावल्याने सदर अपघातात ट्रक चालक आरोपी हा कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व वैद्यकीय रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. चव्हाण पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**८) गळफास लावुन तरूनाचा मृत्यु :—**

दिनांक ३०/०१/२०१८ चे २०.३० ते ३१/१/२०१८ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील मृतक विकास रिध्दीनाथ कापगते वय २८ वर्ष रा. राजापुर हा फिर्यादीचा पुतन्या लागत असुन मृतक हा फिर्यादीचे घरी राहत होता, मृतक हा नेहमी प्रमाणे जेवन करून फिर्यादीचे घरी वरच्या खोलीत झोपण्यास गेला, त्याने छताला असलेल्या सिलिंग फॅनला नॉयलान दोरीने, गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी चद्रकांत बिसन कापगते वय ४२ वर्ष रा. राजापुर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोटींग पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**९) औषधोपचार दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ३०/०१/२०१८ चे ११.१५ वाजता. दरम्यान यातील मृतक शंकर रामाजी कुरंजेकर वय ५५ वर्ष रा. बेलघाटा वार्ड पवनी याने दि. २८/१/२०१८ चे १२.०० वा. दरम्यान युपीपी ओल्ड सिव्हीई या आजाराने त्रस्त असल्याने विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. भंडारा नेले असता आयसीयु मध्ये भरती केले असता त्यास उपचारा दरम्यान डॉ. नान्हे सा. रू. भंडारा यांनी तपासुन दि. ३०/१/२०१८ चे ११.१५ वा. मृम घोषीत केल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जा.फौ चे कागद पत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्हाके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**१०) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक ३०/०१/२०१८ चे १३.०० ते २०.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी उमेश तुलारामजी कुकडे वय ३७ वर्ष रा. खैरी याची हिरो होन्डा स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी ४०५७ कि. २०,०००/रु. ची ही बहुउद्देशीय परम पुज्य परमात्मा एक भवना जवळ ठेवली असता कोणी तरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोयंडे स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**११) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ३१/०१/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील आटो ही मुरमाडी येथील येणारे जाणारे लोकांना अडथडा निर्माण होईल व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोशी. तिजारे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पो.स्टे. पालादुंर हे करीत आहेत.

**१२) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक ३१/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, कारधा, करडी व साकोली येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४३ लिटर हातभंट्टी दारू किंमती ४,३००/—रु, तसेच जुगारातुन २,४५०/रु. असा एकुन कि.६,७५०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ३१/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनाकरीता ०४ ईतर वाहनांवरती – ९० केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.